# डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला

कृषिनगर, अकोला ४४४ १०४ (महाराष्ट्र)

सूचना का अधिकार

डॉ. सुरेंद्र रा. काळबांडे

कुलसचिव

Phone No. : 0724-2258372

E-Mail –registrar@pdkv.ac.in


**महत्वाचे**

**विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांची वैद्यकीय तपासणी करण्याबाबत ..**

**वाचा:** १) शासन निर्णय क्र. एलपीएल-२०१७/प्र.क्र. २१/का.पंधरा, दि.१० जून, २०१९.

२) शासन निर्णय क्र. वैतधो-२०२१/प्र.क्र. ३७/आरोग्य-३, दि.२२ एप्रिल, २०२२.

**परिपत्रक**

**क्रमांक :** बीएए/वैतधो/२०२२/३०९ | ७५६ **दिनांक :** ०३/०६/२०२२

**प्रस्तावना :**

संदर्भिय शासन निर्णय दि. १०.०६.२०१९ अन्वये विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांना वयाच्या ५०/५५ व्या वर्षापलीकडे/ अर्हताकारी सेवेच्या ३० वर्षानंतर सेवेचे पुर्नविलोकन करून मुदतपूर्व सेवानिवृत्त करण्याबाबतची एकत्रित कार्यपध्दती विद्यापीठ परिपत्रक क्र. बीएए/५०-५५/सेवा पुर्नविलोकन/२०२१/०३, दिनांक ०३.०१.२०२२ नुसार विहीत करण्यात आली आहे. त्यानुसार अधिकारी/ कर्मचारी यांच्या सेवेचे पुनर्विलोकन करतांना काही निकष नमुद केले आहेत. त्यात शारिरीक क्षमता/ प्रकृतिमान तपासणे हा महत्वाचा निकष आहे. अधिकारी/ कर्मचारी यांची शारिरीक क्षमता / प्रकृतिमान योग्य नसल्यास त्याचा शासकिय कामकाजावर विपरित परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्याचप्रमाणे सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्र. सीएफआर-१२११/प्र.क्र. २५७/तेरा, दि. ०७.०२.२०१८ सोबत दिलेल्या कार्यमूल्यमापन अहवालाच्या नमुन्यातील भाग-३ (प्रतिवेदन अधिका-याने लिहावयाचा मुल्यमापन अहवाल) यातील मुद्या क्र. ७ मध्ये, प्रकृतिमान यासमोर (उत्कृष्ठ/ चांगला/ चांगले नाही) अशी वर्गवारी दिलेली आहे. सबब, प्रतिवेदन अधिका-याने संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या गोपनिय अहवालात प्रकृतिमान संदर्भात शेरे लिहिण्यापूर्वी संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी अहवाल पाहून शेरे लिहिल्यास ते वास्तविकतेला धरून राहतील. यासंदर्भात उपरोक्त शासन निर्णय दि. २२ एप्रिल, २०२२ च्या अनुषंगाने विद्यापीठ स्तरावर परिपत्रक निर्गमित करण्यात येत आहे.

**विद्यापीठ परिपत्रक :-**

१. संदर्भिय शासन निर्णय दि. २२ एप्रिल, २०२२ अन्वये राज्यातील शासकिय सेवेत कार्यरत असलेले वय वर्ष ४० ते ५० या वयोगटातील सर्व शासकिय अधिकारी व कर्मचारी यांना दोन वर्षातून एकदा व वय वर्ष ५१ व त्यावरील वयोगटातील सर्व शासकिय अधिकारी व कर्मचारी यांना दरवर्षी वैद्यकीय तपासणी अनुज्ञेय असून वैद्यकिय तपासणीकरीता रू. ५०००/- याप्रमाणे इतक्या रकमेपर्यंतच्या खर्चाची प्रतिपूर्ती प्रत्येक अधिकारी व कर्मचारी यांना अदा करण्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

२. सदर शासन निर्णयाच्या अनुषंगाने विद्यापीठातील वय वर्ष ४० पुढील अधिकारी व कर्मचारी यांना प्रपत्र-अ येथे नमूद करण्यात आलेल्या चाचण्या सर्व शासकिय वैद्यकिय महाविद्यालये व सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अधिनस्त आरोग्य संस्थांमार्फत करण्यास मुभा राहील. तसेच यापैकी काही चाचण्या उपरोक्त संस्थामध्ये उपलब्ध नसल्यास सदर चाचण्या बाह्ययंत्रणेव्दारे करणेबाबतचा शासन निर्णय झाल्यावर तशा सूचना स्वतंत्रपणे निर्गमित करण्यात येतील.

**३. सदर वैद्यकिय तपासणी करतांना खालील सुचनांनुसार कार्यवाही करण्यात यावी.**

३.१ विद्यापीठ सेवेतील अधिकारी व कर्मचारी ज्यांचे वय ४० वर्षे व त्यापेक्षा अधिक वयोगटातील कर्मचा-यांना सोबत जोडलेल्या प्रपत्र-अ मध्ये दर्शविल्याप्रमाणे सर्व वैद्यकिय तपासण्या लागू राहतील. सदर वैद्यकिय चाचण्यांसाठी आवश्यक असलेली रक्कम अधिकारी/ कर्मचारी यांनी प्रथम स्वत: अदा करावी व त्याची प्रतिपूर्ती रू. ५०००/- इतक्या

रकमेच्या मर्यादेत कर्मचा-याने स्वतःच्या कार्यालयातून मिळवावी. त्याकरीता कोणत्याही प्रकारचे वेतन अग्रिम देण्यात येणार नाही. तसेच सदर रकमेच्या प्रतिपूर्तीचा लाभ घेतल्यास आयकर परिगणना करीता याचा लाभ देय होणार नाही.

३.२ अधिकारी व कर्मचा-यांनी शासकिय/ निमशासकिय रूग्णालये / वैद्यकिय महाविद्यालये येथे वैद्यकिय चाचण्या केल्यास त्या निशुल्क किंवा नाममात्र शुल्क असल्यामुळे त्यांची प्रतिपूर्ती आकरण्यात आलेल्या शुल्काच्या मर्यादेत अनुज्ञेय राहील. तथापि, सदर शुल्काची प्रतिपूर्तीची एकूण मर्यादा रू ५०००/- इतक्या रकमेपर्यंत राहील. तसेच प्रतिपूर्तीची मागणी करताना वैद्यकिय चाचण्या केल्याचे संबंधित संस्थेचे मूळ देयक कार्यालयास सादर करणे बंधनकारक राहील.

३.३ वैद्यकिय तपासण्यांचा १ दिवस हा कालावधी कर्तव्यकाळ म्हणून समजण्यात येईल. तसेच तपासण्यांसाठीची पुर्वतयारी/ आवश्यक खबरदारी सुध्दा रूग्णालयाच्या सल्याने अधिकारी/ कर्मचारी यांनी स्वतः घ्यावी.

३.४ वैद्यकिय तपासणीसाठी मुख्यालय किंवा मुख्यालयाबाहेरील रूग्णालयात जाणार असल्याची पूर्वकल्पना अधिका-यांनी/ कर्मचा-यांनी, त्यांच्या लगतच्या वरिष्ठ अधिका-यांना देणे आवश्यक राहील.

३.५ सदर शासन निर्णयान्वये वार्षिक वैद्यकिय तपासणीच्या खर्चाची प्रतिपूर्ती घेणा-या अधिका-यांना, शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग कमांक एमएजी-१०९८/प्र.क्र./ २२०/ आरोग्य-३, दिनांक ३१ ऑगस्ट, २००६ अन्वये दर दोन वर्षातून एकदा अनुज्ञेय असलेली वैद्यकिय तपासण्यांवरील प्रतिपूर्ती देय राहणार नाही.

३.६ वैद्यकिय तपासणी झाल्याची नोंद अधिकारी व कर्मचारी यांच्या गोपनीय अहवालात करावयाची असल्याने सदर तपासण्या करण्याचा कालावधीची गणना आर्थिक वर्षाप्रमाणे (०१ एप्रिल, २०२२ ते ३१ मार्च, २०२३) करण्यात यावी. या कालावधीत संबंधित रूग्णालयाशी परस्पर संपर्क साधून तपासणीच्या तारखा निश्चित करून घ्याव्यात व प्रपत्र अ मधील सर्व वैद्यकिय तपासण्या करून घ्याव्यात. तसेच सदर चाचण्या करण्यांची वयोमर्यादा ४० वर्ष व त्यावरील अधिकारी व कर्मचा-यांना लागू असल्याने ज्यांचे ज्या आर्थिक वर्षात वय ४० वर्ष पूर्ण होते, त्या आर्थिक वर्षापासून सदर तपासण्या करण्यांचा लाभ लागू/ देय राहील.

३.७ वैद्यकिय चाचण्यांवरील खर्च संबंधित अधिकारी/ कर्मचारी यांच्या आस्थापनेवरील वेतन व भत्ते खर्चांतगत लेखाशीर्षाखाली खर्ची टाकण्यात यावा व त्या-त्या वर्षासाठीच मंजूर अनुदानातून सदर खर्च भागविण्यात यावा. मात्र यासाठी आर्थिक वर्षाचे बंधंन राहणार नाही. **(यासाठी विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी खर्च प्रतिपूर्ती करणेकरीता खर्चाच्या तरतुदीबाबत नियंत्रक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला हे स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करतील.)**

४. सदर तपासण्या केल्यानंतर त्यांचा अहवाल वैद्यकिय अधिका-याने उपलब्ध करून दिल्यावर संबंधित कार्यालय प्रमुखास सादर करावा किंवा गोपनीय अहदालासोबत ठेवावा याबाबतच्या सूचना शासन निर्णय प्राप्त झाल्यावर या कार्यालयाकडून निर्गमित करण्यात येतील.

मा. कुलगुरू महोदय यांच्या मान्यतेने.

स्वा/-
कुलसचिव
डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**प्रतिलिपी माहिती व पुढील कार्यवाहीकरीता अग्रेषित :**

१. संचालक (शिक्षण)/संचालक (संशोधन)/संचालक (कृषि विस्तार शिक्षण), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
२. अधिष्ठाता (कृषि)/ अधिष्ठाता (कृषि अभि.)/अधिष्ठाता (शिक्षण)/ अधिष्ठाता (उद्यानविद्या), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला
३. सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, अकोला/नागपूर/गडचिरोली/मुल,चंद्रपूर/उद्यानविद्या महाविद्यालय, अकोला/ वनविद्या महाविद्यालय, अकोला/ कृषि अभियांत्रिकी महाविद्यालय, अकोला/ पदव्युत्तर शिक्षण संस्था, अकोला/निम्न कृषि शिक्षण, अकोला/ व.ना.कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय,यवतमाळ/ अन्न तंत्रज्ञान महाविद्यालय, यवतमाळ.
४. विभाग प्रमुख, कृषिविद्या विभाग/ कृषि वनस्पतीशास्त्र विभाग/ कृषि वनस्पती रोगशास्त्र विभाग/ उद्यानविद्या विभाग/ मृद विज्ञान व कृषि रसायनशास्त्र विभाग/ किटकशास्त्र विभाग/ वनविद्या विभाग/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र विभाग/ कृषि विस्तार शिक्षण विभाग/ कृषि अर्थशास्त्र व सांख्यिकी विभाग, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

५. विभाग प्रमुख, कृषि अभियांत्रिकी विभाग/ मृद व जलसंधारण अभियांत्रिकी विभाग/ कृषि शक्ती व औजारे विभाग/ कृषि प्रक्रिया अभियांत्रिकी विभाग/ कृषि स्थापत्य अभियांत्रिकी विभाग/ सिंचन व निचरा अभियांत्रिकी विभाग / अपारंपरिक ऊर्जा स्त्रोत आणि विद्युत अभियांत्रिकी विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

६. वरिष्ठ संशोधन शास्त्रज्ञ, कापूस/ ज्वारी/ तेलबिया/ कडधान्य/ गहू संशोधन केंद्र, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

७. सहयोगी संशोधन संचालक, संशोधन संचालनालय, अकोला/ विभागीय कृषि संशोधन केंद्र, यवमाळ/ सिंदेवाही

८. प्रमुख शास्त्रज्ञ, अ.भा.स.सं.प्र.,(कोडरवाहू शेती)/ संशोधन अभियंता, अ.भा.स.सं.प्र.,(कापणी पश्चात तंत्रज्ञान)/ वरिष्ठ उद्यानविद्यावेत्ता, अ.भा.स.सं.प्र.,( लिंबूवर्गीय फळे ), डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

९. संचालक, मध्यवर्ती संशोधन केंद्र / कृषि पध्दती व पर्यावरण केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

**१०. नियंत्रक, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांनी विद्यापीठ अधिकारी/ कर्मचारी यांचे वैद्यकिय तपासणी खर्च प्रतिपूर्ती करीता खर्चाच्या तरतुदीबाबत आपले स्तरावर स्वतंत्रपणे आदेश निर्गमित करावेत.**

११. विद्यापीठ ग्रंथपाल/ विद्यापीठ अभियंता/ विद्यार्थी कल्याण अधिकारी, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१२. उपसंचालक संशोधन (बियाणे)/ बियाणे संशोधन अधिकारी, बियाणे तंत्रज्ञान संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

१३. मुख्य बिजोत्पादण अधिकारी, मध्यवर्ती प्रात्यक्षिक प्रक्षेत्र, वणीरंभापूर

१४. मुख्य कृषि विद्यावेत्ता, एकात्मिक शेती संशोधन प्रकल्प/ क्षेत्र अधिकारी, कृषि मुल्य योजना, डॉ.पं.दे.कृ.वि.,अकोला

१५. पैदासकार तथा उद्यानविद्यावेत्ता, मिरची व भाजीपाला संशोधन विभाग, डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

१६. माहिती अधिकारी, कृषि तंत्रज्ञान माहिती केंद्र, डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

१७. प्रमुख, प्रादेशिक संशोधन केंद्र, अमरावती/ उद्यानविद्यावेत्ता, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल

१८. प्राध्यापक तथा प्रमुख, कृषिविद्या शाखा/ पशुसंवर्धन व दुग्धशास्त्र शाखा/ उद्यानविद्या शाखा, कृषि महा., नागपूर

१९. प्रभारी अधिकारी, नागार्जून वनऔषधी केंद्र/ मत्सशास्त्र संशोधन केंद्र/ विद्यापीठ मुद्रणालय/ डॉ.पंजाबराव देशमुख स्मृती केंद्र/ माळी प्रशिक्षण/ डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

२०. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन केद्र, अचलपूर/ यवतमाळ/ वाशिम/ बुलढाणा/ एकार्जूना/ कुटकी/ सिंदेवाही/ सोनापूर/ थारसा/ साकोली/ नवेगांवबांध/ पानवेली संशोधन केंद्र, दिवठाणा/ रामटेक/ कडधान्य व गळीत धान्य संशोधन केंद्र, आमगांव म्हाली/ जवस पैदासकार तथा प्रभारी अधिकारी, जवस संशोधन केंद्र, नागपूर/ महाराजबाग, प्राणी संग्रहालय, नागपूर/ वनशेती संशोधन, फुटाळा फार्म, नागपूर

२१. प्राचार्य, कृषि तंत्र विद्यालय, निंबी-मालोकार/ बुलढाणा/ धारणी/ वरुड/ सावंगी/ सेलसुरा/ हिवरा/ मुल-मारोडा

२२. कार्यक्रम समन्वयक, कृषि विज्ञान केंद्र, बुलढाणा/ यवतमाळ/ सेलसुरा/ साकोली/ सोनापूर/ सिंदेवाही/ हिवरा

२३. उपकुलसचिव (आस्थापना)/ उपकुलसचिव (साप्रवि)/ उपकुलसचिव (विद्याविषयक)/ सहा. कुलसचिव (समिती)

२४. अधिदान व लेखाधिकारी, अकोला/ नागपूर

२५. कुलगुरु यांचे स्वीय सहायक यांना मा. कुलगुरु महोदय यांचे माहितीकरीता सादर.

२६. ........................................................................................ , डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला

२७. प्रभारी अधिकारी, कृषि संशोधन माहिती यंत्रणा कक्ष (ARIS), डॉ. पं.दे.कृ.वि., अकोला यांना सुचित करण्यात येते की, सदर परिपत्रक व सहपत्रित दस्तऐवज विद्यापीठ संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

कुलसचिव
डॉ.पं.दे.कृ.वि., अकोला

In Charge, Agricultural Research ... P.D.K.V. Akola
Inward No. 6/06/22
Dt.: 71

शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग,क्रमांक-वैतधो-२०२१/प्र.क्र.३७/आरोग्य-३,
दिनांक - २२ एप्रिल, २०२२ सोबतचे प्रपत्र

## ४० वर्ष व त्यावरील वयोमर्यादा असलेला सर्व वेतनश्रेणी व गटातील कार्यरत शासकिय सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांकरीता वैद्यकीय चाचण्यांचा तपशिल

Name : Age: Years Sex: M/F

A. Investigations Reports

| | |
|---|---|
| 1 | (a) Haemoglobin<br>(i) Haemoglobin<br>(ii) TLC (Total Leukocyte Count)<br>(iii) DLC (Differential Leukocyte count<br>(a) Polymorphs<br>(b) Lymphocytes<br>(c) Eosinophils<br>(d) Basophils<br>(e) Monocytes<br>(iv) Peripheral Smear<br>(b) Thyroid Profile<br>i) T3<br>ii) T4<br>iii) TSH<br>(c) Vit.B12 test<br>(d) Vit. D3 test |
| 2 | Urine Examination<br>(i) Colour<br>(ii) Albumin<br>(iii) Sugar<br>(iv) Microscopic Exami<br>Stool routine<br>(i) Ova, cyst<br>(ii) Occult blood |
| 3 | Blood Sugar<br>(i) Fasting<br>(ii) Post- Prandial<br>(iii) HbAIC<br>(iv) Insulin (Fasting) |

| | |
|---|---|
| 4 | Lipid Profile<br>(i) Total Cholesterol<br>(ii) HDL Cholesterol (High Density Lipoprotein Cholesterol)<br>(iii) LDL Cholesterol (Low Density Lipoprotein Cholesterol)<br>(iv) VLDL Cholesterol (Very Low Density Lipoprotein Cholesterol)<br>(v) Triglycerides |
| 5 | Liver Function Tests<br>(i) S. Bilirubin (Total) (Serum Bilirubin)<br>(ii) S. Bilirubin (Direct) (Serum Bilirubin)<br>(iii) S.G.O.T. (Serum glutamic oxaloacetic transaminase)<br>(iv) S.G.P.T. (Serum glutamic Pyruvic transaminase)<br>(v) Australia Antigen Test (Hepatitis B)<br>(vi) Serum Total proteins<br>Albumin, Globilin, A/G ratio<br>(vii) Prothrombin time (P.T.) INR |
| 6 | Kidney Function Tests<br>(i) Blood Urea<br>(ii) S. Creatinine (Serum Creatinine)<br>(iii) S. Uric Acid ( Serum Uric Acid)<br>(iv) Na + (sodium)<br>(v) K (Potassium)<br>(vi) calcium<br>(vii) Inorganic Phosphours |
| 7 | Cancer screening<br>A) For Men<br>i) PSA (Prostate Specific Antigen test)<br>ii)LAD ( Lactic Acid Dehydrogenase test)<br>B) FOR WOMEN<br>i) PAP-SMEAR (Papanicolaou test) |
| 8 | X-Ray Chest PA view Report |
| 9 | ECG Report (Electrio Cardiogram Report) |
| 10 | USG Abdomen with pelvis (Ultrasonography Abdomen with pelvis Report) |
| 11 | TMT Report ( Treadmil test)/ Stress test |
| 12 | Mammography Report (Women) |

| | |
|---|---|
| 13 | Gynaecological Health Check up<br>(i) Pelvic Examination<br>(a) Local Examination<br>(b) Per Vaginum (PV)<br>(c) Per Speculum<br>(ii) Surgical Examination<br>(iii) Breast Examination |
| 14 | (i) Urological Examination (For Men Only)<br>(ii) Rectal Examination (For Men Only) |
| 15 | Systemic Examination<br>(i) Resp System (Respiratory System)<br>PFT (Pulmonary Function test)<br>(ii) CVS (Cardiovascular System)<br>(iii) Abdomen<br>(iv) CNS (Central Nervous System)<br>(v) Locomotor System<br>(vi) Dental Examination |
| 16 | Eye Examination<br>(i) Distant Vision<br>(ii) Vision with Glasses<br>(iii) Colour Vision<br>(iv) Tonometry<br>(v) Fundus Examination |
| 17 | ENT<br>(i) Oral Cavity<br>(ii) Nose<br>(iii) Throat & Neck<br>(iv) Larynx |